अन्याय अत्याचाराविरोधात आवाज बुलंद करणारे एकमेव वृत्तपत्र

Email: vedhtajya@gmail.com / Website: Wedhtajyaghadamodincha.com

# वेध ताज्या घडामोडींचा

संपादक - सुनिता भगवान केसभट
मो.९९८७५८१३४८

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे, अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, सातारा येथून एकाचवेळी प्रकाशित होणारे वृत्तपत्र

वर्ष : १०वें | अंक :०६ | गुरुवार, १५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२४ | RNI No. MAHMAR/2015/64681 | पृष्ठ : ४ | मूल्य : २ रुपये

# 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत अर्ज केलेल्या महिलांनी बँक खाते आधारकार्डशी संलग्न करावे

## त्रुटी असलेल्या अर्जांबाबत संबंधित महिलांनी तात्काळ आशासेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवकाशी संपर्क साधावा

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

ठाणे - 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेसाठी ठाणे जिल्ह्यातून एकूण ५ लाख ३ हजार ८० अर्ज पात्र ठरले असून ३७ हजार अर्ज त्रुटीयुक्त आहेत. मात्र अद्याप ज्या महिलांचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न केलेले नाही, अशा महिलांनी संबंधित बँकेत जावून बँक खाते आधार कार्डशी संलग्न करण्याची कार्यवाही करून घ्यावी, तसेच त्रुटी असलेल्या अर्जांच्या बाबतीत संबंधित महिलांनी तात्काळ आशा सेविका/अंगणवाडी सेविका/ ग्रामसेवक किंवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड व जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) संजय बागूल यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या आधार संलग्न बँक खात्यात दरमहा एक हजार पाचशे रुपये रक्कम जमा केली जाणार आहे. यासाठी संबंधित महिलेचे बँक खाते आधार संलग्न (आधार सीडिंग) केलेले असणे आवश्यक आहे. 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज करताना अर्जामध्ये नमूद आधार क्रमांकाला संलग्न केलेल्या बँक खात्यात लाभाची रक्कम थेट (डीबीटीद्वारे) जमा केली जाणार आहे. त्यामुळे महिलांनी आपले बँक खाते आधार संलग्न करून घेणे आवश्यक आहे. तसेच बँक खात्याची




ई-केवायसी करणेही आवश्यक आहे. ई-केवायसी करण्याची कार्यवाही नजीकच्या सेतू केंद्रावर करता येईल. मात्र, बँक खाते आधार संलग्न करण्याची कार्यवाही संबंधित बँकेत जावून करणे आवश्यक आहे. बँक खाते आधार संलग्न करण्याबाबत जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आणि संबंधित बँकांना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. योजनेसाठी अर्ज सादर करताना काही महिलांनी आपले खाते आधार संलग्न नसल्याचे नमूद केले आहे. अशा महिलांनी आपले बँक खाते आधार संलग्न करण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी,त्याचबरोबर जिल्हा प्रशासनाने त्रुटीयुक्त प्रकरणांनाही न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न सुरू केला आहे. यासाठी त्रुटी असलेल्या संबंधित महिलेने आपल्या नजीकच्या आशा सेविका/ अंगणवाडी सेविका/ग्रामसेवक किंवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा व आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करून आपला अर्ज मंजूर करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# चंद्रशेखर घुले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित खेळ पैठणीचा कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद



**पांडुरंग निंबाळकर/प्रतिनिधी**

अहमदनगर - माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांचा १६ ऑगस्ट रोजी वाढदिवस आहे. आतापासूनच संपूर्ण शेवगांव तालुक्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दि. १३ ऑगस्ट रोजी तालुक्यातील बोधेगांव येथील भगवानबाबा लॉन्समध्ये खास महिलांसाठी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला कार्यक्रमास महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यामध्ये विविध स्पर्धेत महिलांनी भाग घेवून पैठणी मिळवल्या तसेच रोख रक्कम आणी फ्रिज, कुलर, पंखा इत्यादी अनेक गृहपयोगी वस्तुंची बक्षीसे महिलांनी लुटली. सकाळी १० वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली. माजी आ. नरेंद्र घुले यांच्या पत्नी सौ. निलिमा घुले यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तर मा. आ. चंद्रशेखर घुले यांच्या पत्नी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्री घुले, माजी सभापती क्षितीज धुले यांच्या पत्नी तेजस्वीनी घुले यांनी येणाऱ्या महिलांचे स्वागत करून बक्षिस वितरण केले. क्रांती नाना मळेगांवकर यांच्या न्यु होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचा महिलांनी मनमुराद आनंद घेतला.

यावेळी बोलतांना राजश्री घुले म्हणाल्या की सर्व सामान्य माणसाच्या कष्टाला प्रतिष्ठा मिळवून देवून गोरगरीब, दिन दलितांच्या वेदना समजावुन घेवुन त्यांना ताठ मानेने जगता यावे, स्वाभिमानाचे जगणे जगण्या साठी सर्वांना बरोबर घेऊन तालुक्याचा विकास करण्याची शिकवण स्व. मारुतरावजी घुले पाटील यांनी आम्हाला दिली आहे. तोच वारसा नरेंद्र घुले, चंद्रशेखर घुले, क्षितीज घुले आणि आम्ही घुले परिवारच्या महिला समर्थपणे चालवत आहोत. नरेंद्र घुले पाटील आणि चंद्रशेखर घुले पाटील विधान सभेत असतांना जो शेवगांव-पाथर्डीचा विकास झाला जी भरीव कामे झाली. विकास काय असतो तो आम्ही दाखवून दिला आहे. मध्यंतरी दहा वर्षात दोन्ही तालुके बकाल झाली. आपल्याला कोणी वाली राहीला नाही. त्यामुळे चंद्रशेखर घुले हा हक्काचा माणूस विधान सभेत पाठवा असे आवाहन घुले यांनी केले. कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. चंद्रशेखर घुले मित्र मंडळ आणी क्षितीज भैया युवा मंच यांनी माया कार्यक्रमाचे नेटके आयोजन केले होते.

# पद्मश्री शंकर महादेवन यांचा 'घरोघरी तिरंगा' अभियानात सहभाग

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिकेच्यावतीने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ९ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' अभियान विविध उपक्रमांचे आयोजन करीत व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. यामध्ये स्वच्छ नवी मुंबई मिशनचे महानगरपालिका ब्रँड ॲम्बेसेडर सुप्रसिद्ध गायक, संगीतकार शंकर महादेवन यांनी सहभागी होत महापालिका मुख्यालयातील भेटीप्रसंगी तिरंग्यासह सेल्फी काढत तसेच तिरंगा कॅनव्हासवर स्वाक्षरी करून घरोघरी तिरंगा अभियानात सहभागी होत नागरिकांना १३ ते १५ ऑगस्ट या



कालावधीत आपले घर, कार्यालयात तिरंगा फडकविण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासह तिरंगा ध्वज हातात धरून झळकवत राष्ट्राभिमान दर्शविला आणि नागरिकांनाही आपल्या देशाविषयीचे प्रेम व्यक्त करण्याची चांगली संधी घरोघरी तिरंगा अभियानाच्या माध्यमातून उपलब्ध झाली असल्याचे सांगितले.




# विदर्भाला सुजलाम सुफलाम करणारा वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प मंजूर

## जलअभ्यास डॉ. प्रवीण महाजन याच्या लढ्याला यश

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

मुंबई - ज्या जिल्ह्यात पाण्याचा दुष्काळ आहे त्या पश्चिम विदर्भात पूर्वचे विदर्भाचे जास्तीचे, वाहून जाणारे पाणी नेणारा हा महत्वाकांक्षी प्रकल्प-वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प. आज १० वर्षे प्रतीक्षेनंतर महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात जलसंपदाने ठेवला होता. आजच्या झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत एकमुखाने मंजूर करण्यात येवून विदर्भातील सहा जिल्ह्याला सुजलाम सुफलाम करण्याचा निर्णय झाला.

३ नोव्हेंबर २०१४ ला जल अभ्यासक डॉ. प्रवीण महाजन यांनी तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देवून साकडे घातले होते. त्यावर मुख्यमंत्री यांनी जलसंपदा विभागाला या प्रकल्पाचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राष्ट्रीय जलविकास अभिकरण नवी दिल्ली यांनी प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास करून डीपीआर सादर करण्यास सांगितला होता. त्यानुसार त्यांनी २०१८ मध्ये प्रकल्प अहवाल सादर केला. राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांनी यावर सविस्तर अभ्यास करून राज्य जल परिषदेच्या बैठकीत मंजूर करून एकात्मिक राज्य जल आराखड्यात समाविष्ट करण्यात आला आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणानी दिलेल्या निर्देशानुसार सर्व सविस्तर प्रकल्प अहवाल आकडेवारी नुसार सादर करून त्यानीही या प्रकल्पासाठी



हिरवी झेंडी दाखवली. राज्याचे राज्यपाल यांना या प्रकल्पासाठी मंजूरात देण्याची विनंती महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आली. राज्यपालानी मंजूरात दिल्यावर नियोजन विभाग व अर्थ विभागाने सुध्दा अभ्यास करून मंत्रीमंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

हि विदर्भातील शेतकऱ्यांना एक प्रकारे मिळालेली सर्वात मोठी भेट ठरणार आहे. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळणार. आत्महत्या ग्रस्त भागाचा कंलक या प्रकल्पामुळे पुसला जाणार. ज्या भागात पिण्याच्या पाण्याची सोय नाही त्या ठिकाणी या प्रकल्पामुळे पाणी उपलब्ध होणार. पाणी आल्याने उद्योग धंदे वाढीस जावून तरूणांना रोजगार मिळेल असा हा बहुआयामी प्रकल्प मंजूर झाल्यामुळे विदर्भ सुजलाम सुफलाम होईल.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ४२६.५ किमी असून सहा जिल्ह्यातून जाणार असल्याने या सहा जिल्ह्यासोबत आजूबाजूच्या जिल्ह्यानाही समृद्ध करणार आहे. यात १५ तालुके येतील. ४२६.५ किलोमीटरचा हा कालवा असून यात १३.८३ किलोमीटरचे बोगदे असणार आहे. २५.९८ किमीअंतर बंद नलिकेतून पाणी वहन केले जाईल. पाणी उचल स्थळे ही ६ असतील. या ४२६.५ किलोमीटरच्या मार्गावर ४१ पाणी साठा स्थळे असतील. यात ३१ नव्याने उभारली जातील तर १० ही अस्तित्वात असलेली असणार आहे. नागपूर जिल्ह्यामध्ये सातारा, पांडेगाव, सावरगाव, खुरसापार, सायकी, मकरधोकडा, पांढरा बोडी, ठाणा, खैरगाव कारगाव, खालसाना, वडगाव, भानसोली, आणि मांगली

# महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते वासांबे विभागासाठी रुग्णवाहिका लोकार्पण!



उरण - यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था तसेच रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचा दरवर्षी दोन रुग्णवाहिका लोकार्पण करण्याचा मानस आहे. त्या अनुषंगाने मागच्या महिन्यात दिघोडे ग्रामपंचायतीसाठी तर खालापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष कृष्णा पारंगे यांच्या वाढदिवसाचे अवचित्त साधून रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रोजी वासांबे विभागासाठी संस्थेच्या सौजन्याने १४ वी रुग्णवाहिका रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष तथा राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे शुभहस्ते लोकार्पण करण्यात आले.

यावेळी वासांबे विभागातून मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ग्रामस्थानी महेंद्रशेठ घरत यांचे आभार मानले व जनते साठी काम करणारे खरे दानशूर व खरे समाजसेवक महेंद्रशेठ घरत आहेत असे गौरवोद्गार काढले. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले या उक्तीप्रमाणे महेंद्रशेठ घरत समजासाठी बोलतात ते करतात असे ग्रामस्थ म्हणाले.

हा कार्यक्रम कृष्णा गंगाराम पारंगे यांच्या रीस निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी काँग्रेसचे जेष्ठ नेते नाना म्हात्रे, खालापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कृष्णा पारंगे, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अशोक मुंडे, रायगड युवक अध्यक्ष निखील डवळे, महिला अध्यक्षा दिप्ती म्हात्रे, माजी सभापती कांचन पारंगे, ग्रामपंचायत सदस्या उर्मिला डवले, विनायक देशमुख, प्रमोद राईळकर, राम कुरुंगले, डॉ. संजय कुरुंगले, मधुकर दळवी, निलेश ठोंबरे, अनंता दळवी, प्रतिप पाटील (सरपंच), श्याम म्हसकर, तसेच मोठ्या संख्येने चौक व वासांबे विभागातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून पनवेलच्या ग्रामीण भागात विकासकामांचा शुभारंभ



**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

पनवेल - पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणारे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ४९ लाख रुपयांच्या स्थानिक ग्रामविकास निधीतून ग्रामीण भागात करण्यात येणाऱ्या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी झाले. ही कामे मार्गी लावल्याबद्दल या वेळी ग्रामस्थांनी आभार मानले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २५१५ या स्थानिक ग्रामविकास निधीतून १० लाख रुपये खर्चून वावंजे ग्रामपंचायत मधील कुंभारपाड्यातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, वावंजे ते पालेखुर्द रस्त्याचे २० लाख रुपयांमधून रस्ता काँक्रीटीकरण, खानाव ग्रामपंचायतीमधील महालुंगी आदिवासीवाडीतील अंतर्गत रस्त्याचे ०९ लाख रुपये खर्चून काँक्रीटीकरण, तर खैरवाडीतील कोंडले येथे १० लाख रुपये खर्चून विसर्जन घाट बांधण्यात येणार आहे. या विकासकामांचे भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी आणि महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष कमला देशेकर यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.

# चौल चौकी ते श्री क्षेत्र रामेश्वर मंदिर येथील रस्ता काँक्रिटीकरण

## महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नामुळे रस्त्याचे काम पूर्ण, नागरिकांमध्ये समाधान

अलिबाग - नागरिकांच्या प्रश्नांची दखल घेऊन तत्पर कार्य करणारे आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी अलिबाग तालुक्यातील चौल मधील चौल चौकी ते श्री क्षेत्र रामेश्वर मंदिर येथील रस्ता काँक्रिटीकरण करण्याचे काम पूर्ण केले आहे. चौल ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन रामेश्वर मंदिराचा रस्ता पूर्ण करण्यात आला त्यांच्या कामामुळे नगरीकानी आमदार महेंद्र दळवी यांचे आभार मानले आहे.

यावेळी ऊबाठाचे चौल शाखा प्रमुख श्री महेंद्र घरत यांनी त्यांच्या सहकार्यासोबत उबाठाच्या भगव्या सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी मा. आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या कार्यशैलीने प्रभावित होऊन गावाच्या विकासासाठी शिवसेनेत जाहीर प्रवेश घेतला. त्यावेळी आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या सोबत पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच चौल ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

अलिबाग तालुक्यातील चौल मधील श्री क्षेत्र रामेश्वर मंदिर येथील भाविकांना पालखी



नेण्यासाठी आवश्यक रस्ता उपलब्ध नव्हता. चौल ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन २० वर्ष रखडलेला पालखी रस्ता मा. आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी तयार करून दिला त्यामुळे परिसरातील नागरिकांनी आमदार दळवी यांचे आभार मानले आहे.

# खारघर महा ई-सेवा केंद्रात नागरिकांची लूट

## तक्रार करूनही प्रशासनाची आंधळी भूमिका हजारो रुपयांच्या लुटीमुळे नागरिक त्रस्त

पनवेल - शहर आणि उपनगरातील महा ई-सेवा केंद्रात सरकारी दाखले काढण्यासाठी ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा नागरिकांकडून अधिक पैसे घेऊन लुटण्याचे प्रकार चालू आहेत. तहसीलदार कार्यालयाकडे याबाबत वारंवार तक्रार अर्ज करूनही प्रशासनाकडून प्रभावी कारवाई केली जात नाही. वेगवेगळ्या प्रकारची कागदपत्रे काढण्यासाठी आलेल्या नागरिकांकडून हजारो रुपये लुटणाऱ्या महा ई सेवा केंद्रांवर कारवाई करण्या एवजी प्रशासनाकडून आंधळी भूमिका घेतली जात आहे.

खारघर सेक्टर १२ पंजाब नॅशनल बँकेच्या मागच्या गल्लीत असलेले महा ई-सेवा केंद्राकडून डिजिटल कार्डच्या नावाखाली आधार कार्डसाठी तब्बल ५०० रुपये उकळले जात आहे. बाकी सर्व महत्वाच्या कागदपत्रासाठी साडेतीन हजार आणि त्यापेक्षा जास्त रक्कम उकळी जात असल्याचे सेवा केंद्रावर आलेल्या नागरिकांनी आमच्याशी बोलताना सांगितले आहे. नागरिकांची लूट करणाऱ्या केंद्रांना काळ्या यादीत टाकण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शहरातील अनेक केंद्रांमध्ये रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला, नवीन रेशन कार्ड, दुबार आणि रेशन कार्ड दाखल्यासह अन्य दाखले काढून दिले जातात. प्रत्येक दाखला काढण्यासाठी वीस रुपये शुल्क आकारणी, दहा रुपयांचे कोर्ट फी स्टँप आणि तीन रुपये सेवा कर मिळून ३३ रुपये रक्कम ठरवून दिली आहे. पण अनेक महा ई सेवा केंद्रे ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा किती तरी पटीने जास्त रक्कम आकारून नागरिकांची लूट करत असल्याचे समोर आले आहे. वेळ वाचवा म्हणून नागरिक जवळच्या सेवा केंद्रावर जातात मात्र तिथे त्यांची लूट हॉट असूनही काहीही न बोलता ग्राहक निमूटपणे सांगितलेले रक्कम देवून गप्प बसतो पण ही लूट किती दिवस चालणार आहे. ग्राहकांना जी ऑनलाइन पावती दिली जाते तिच्यावर शासकीय रककमेवरच हस्ताक्षर घेतले जातात. मात्र ग्राहकाने त्याने काढलेल्या कागदपत्रासाठी पन्नास पट जास्त रक्कम मोजलेले असते. मात्र प्रशासनाणे याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

# शिवसेनेचा उरण तहसील कार्यालयावर धडक मोर्चा

## अनेकवेळा पत्रव्यवहार करूनही समस्या सुटत नसल्याने धडक मोर्चा





**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

उरण - जाणारी वीज, उरणमधील खराब रस्ते, पाच वर्षात एकदाही न झालेले आमसभा, वाहतूक कोंडी, आरोग्याचे प्रश्न, शासकीय कार्यालयातील अंधाधुंदी कारभार, बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, वाढती गुन्हेगारी, नशिली पदार्थांची खुलेआम विक्री, महिलांची असुरक्षितता, सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे, ग्रामसेवक तलाठी कार्यात हजर नसणे, शासकीय दवाखान्यात कर्मचाऱ्यांची कमतरता व औषधांचा तुटवडा या सर्व नागरी समस्या बाबत तहसील कार्यालयात व शासनाच्या विविध विभागात अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही, शासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी गाठी घेऊनही नागरिकांच्या समस्या सुटत नसल्याने शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत शिवसेना स्टाईलने थेट उरण तहसील कार्यालय धडक मोर्चा काढला.

उरण शहरातील व ग्रामीण भागातील विविध नागरी समस्या संदर्भात यापूर्वी शिवसेनेने(उद्धव ठाकरे गटाने) अनेक वेळा पत्रव्यवहार केला. निवेदने दिली विविध अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या मात्र समस्या सुटले नाहीत. शेवटी शिवसेनेच्या वतीने तहसील कार्यालयावर धडक देण्याचा इशारा आठ दिवस अगोदरच प्रशासनाला देण्यात आला. तरीसुद्धा प्रशासनातर्फे शिवसेनेच्या कोणत्याही मागण्या मान्य करण्यात आल्या नाहीत. प्रशासनाच्या कोणत्याही विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे रायगड जिल्ह्याचे शिवसेना (उबाटा गट) जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शहरातील गणपती चौकातील शिवसेना शाखा ते राजपाल नाका, कोट नाका या मार्गे पायी चालत जात निषेध नोंदवत तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

यावेळी माजी आमदार तथा जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, माजी जिल्हाप्रमुख दिनेश पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, माजी सभापती विश्वास म्हात्रे, महिला आघाडीच्या भावना म्हात्रे, ज्योती सुरेश म्हात्रे, मनिषा ठाकूर, रंजना तांडेल, तालुका संघटक बी. एन. डाकी, दिपक भोईर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, शिवसेना तालुका उपसंघटक रुपेश पाटील, विद्यार्थी सेनेचे जिल्हा संघटक रोहिदास पाटील, कोप्रोलीचे माजी उपसरपंच नीरज पाटील, कोप्रोली शाखाप्रमुख रवी म्हात्रे, कोप्रोली माजी शाखाप्रमुख आकाश म्हात्रे, अशोक घरत, श्याम मोकाशी, नंदन म्हात्रे, महेश कोळी, संतोष कोळी, लक्ष्मण ठाकूर, राजेश भोईर, अमिताभ भगत, मंगेश थळी, नारायण तांडेल, नितेश पाटील, नयनेश भोईर, लवेश म्हात्रे आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.


# ख्यातनाम शिल्पकार कै. सदाशिव साठे यांनी साकारलेल्या शिल्पाकृतींचे मुंबईत शिल्प प्रदर्शन

## नेहरू सेंटर, वरळी येथे १४ ते १९ ऑगस्ट रोजी प्रदर्शन सर्वांसाठी खुले!

मुंबई - कल्याणकरांच्या मांदियाळीत मानाचे स्थान स्वतःच्या अंगी असलेल्या उत्स्फूर्त कलेने व त्याला अतीव परिश्रमांची जोड देत फक्त देशात नव्हे तर जगप्रसिद्ध ख्याती मिळवलेले कल्याणचे कै. सदाशिव ऊर्फ भाऊ साठे यांनी साकारलेल्या शिल्पकलांच्या प्रदर्शनाचे आयोजन पहिल्यांदाच मुंबईतील नेहरू सेंटर, हॉल ऑफ हार्मनी, वरळी येथे १४ ऑगस्ट २०२४ ते १९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत भरविण्यात येणार आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत असून सर्व शिल्प कलाकारांसाठी तसेच कला क्षेत्राची आवड असलेल्या सर्व वयोगटातील प्रत्येक व्यक्तीसाठी ही पर्वणीच आहे.



गेट वे ऑफ इंडियाच्या समोरचा अश्वारूढ शिवाजी महाराजांचा पुतळा, ग्वाल्हेर येथील झांशीच्या राणीचा पुतळा, दिल्लीत लाल किल्ल्यासमोरच्या उद्यानात नेताजी बोस यांचे बंदूकधारी सैनिकांसह आक्रमक पवित्र्यातील समूहशिल्प, आसाम गुवाहाटी येथे गांधीचं शिल्प, चंदीगड येथे येशू ख्रिस्त, पंजाबात क्रांतिकारकांची शिल्पे, शिवस्मारके, यशवंतराव चव्हाण, जयप्रकाश नारायण, राधाकृष्णन, अटलबिहारी वाजपेयी अशा बऱ्याच महारथींची आणि अनेक प्रख्यात शिल्पे ज्यांनी साकारली त्या सदाशिव साठे यांचे कार्य आत्ताच्या पिढीपर्यंत पोचून त्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले असल्याचे सदाशिव साठे यांचे सुपुत्र श्रीरंग साठे यांनी सांगितले.



सदाशिव साठे स्मृती संग्रहालय आणि ग्रंथाली यांच्यातर्फे शिल्पगंधर्व सदाशिव साठे यांच्या 'हा ध्यास जीवनाचा' या आत्मकथनाचा पुस्तक प्रकाशन सोहळा सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे. या आत्मकथनाचे सहलेखन- शब्दांकन सतीश कान्हेरे यांनी केले आहे. चित्रकार व कला अभ्यासक माननीय सुहास बहुळकर आणि चित्रपट निमार्ते व दिग्दर्शक माननीय रवी जाधव हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून हा कार्यक्रम केवळ निमंत्रितांसाठी असणार आहे. या शिल्प प्रदर्शनाला सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने भेट द्यावी असे आवाहन श्रीरंग साठे यांनी केले आहे.

# बोधेगाव येथे साईधाम मंदिराचा बारावा वर्धापन दिन उत्साहात

## संतोष शेठ बोथरा, रेखा बोथरा यांच्या हस्ते सपत्नीक नवचंडी यागाचे आयोजन

**पांडुरंग निंबाळकर/प्रतिनिधी**

बोधेगाव - येथील साईधाम मंदिराचा बारावा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी साई मंदिरात विशेष नवचंडी यागाचे महाआरती संतोष शेठ बोथरा, रेखा बोथरा यांच्या हस्ते सपत्नीक पूजेचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये शेकडो भाविक भक्तांनी सहभाग घेतला. दिवसभरात मंदिर परिसरात भजन, कीर्तन आणि प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक आणि बाहेरील साई भक्तांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. संध्याकाळी मंदिरात दीपोत्सव आणि प्रसाद वितरणाचा कार्यक्रम पार पडला, ज्यामध्ये भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. साईधाम मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त या सर्व उपक्रमांना स्थानिक लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



मंदिराच्या विश्वस्त संतोष शेठ बोथरा यांनी यशस्वी कार्यक्रमांसाठी सर्व भक्तांचे आभार मानले आणि पुढील वर्षी अधिक मोठ्या प्रमाणावर वर्धापन दिन साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमा वेळेस साईधामचे संस्थापक संतोष शेठ बोथरा, सौ रेखा बोथरा, यश बोथरा, साक्षी बोथरा, साईधामचे पुजारी राजेंद्र देवा, संपत व्यास, रमेश टोके, दादासाहेब लोणकर, श्रावणी जोशी, ओम जोशी, आबा गाडे उपस्थित होते.

# पनवेल विधानसभा क्षेत्रातील गरीब व गरजू रुग्णांसाठी रक्त व रक्त घटक योग्य व शासकीय दरात मिळवण्यात शिवसेना पक्षाच्या मागणीला यश

पनवेल - पूर्ण पनवेल विधानसभा क्षेत्रामध्ये एकही शासकीय रक्तपेढी नसून, गरीब व गरजू रुग्णांना, ऐनवेळी रक्त व रक्त घटकांच्या पिशव्या प्राप्त करताना त्यांच्या नातेवाईकांना खूप पैसे मोजावे लागत आहेत.



महाराष्ट्र राज्य हे एकमेव राज्य आहे, ज्यामध्ये शासकीय रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना मोफत रक्त पुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे, शासकीय रुग्णालयाच्या अतिरिक्त, इतर रुग्णालयांमधून रक्त किंवा रक्त घटकांचे मागणी असेल, तर शासनाने घोषित केलेल्या, प्रत्येक रक्तपिशवीला फक्त अकराशे रुपये घेण्याचे शासनाचे आदेश आहेत. तसेच, रुग्णांच्या नातेवाईक किंवा मित्र मंडळांनी जर रक्त शासकीय रक्तपेढीला रक्तदान केले असल्यास, डोनर कार्ड दाखवल्यास ११०० रुपये रक्कम पूर्णपणे माफ केली जाते. या डोनर कार्ड ची मुदत दोन वर्ष असते. मात्र खाजगी रक्तपिढ्यांमध्ये, रक्त पिशवी ची रक्कम वाटेल तेवढे घेतली जाते. तसेच डोनर कार्ड असल्यास फक्त पाचशे रुपयाची सवलत प्राप्त होते. त्याचप्रमाणे डोनर कार्ड ची मुदत केवळ एक वर्ष असते.

पनवेल उपजिल्हा रुग्णालय मध्ये रक्त संक्रमण केंद्र असून, ही रक्तपेढी फक्त रक्त स्टोरेज सेंटर म्हणून कार्यरत आहे. रक्त स्टोरेज सेंटरचा अर्थ असा आहे की अलिबाग जिल्हा रुग्णालय मधून रक्तांच्या पिशव्या आणून तेथे साठा केला जातो आणि फक्त उपजिल्हा रुग्णालयाच्या रुग्णांनाच मोफत दिले जाते. इतर बाह्य रुग्णालयांनकडून रक्ताची मागणी आल्यास त्याला नकारले जाते.

# पनवेल–नवी मुंबई विमानतळाचे काम लवकरात लवकर पूर्ण करा – खासदार बारणे

## ▪ पुणे–मुंबई विमानतळावरील ताण कमी करण्याची मागणी

## ▪ नवीन विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्या – बारणे

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

नवी दिल्ली - दिवसेंदिवस विमानाने प्रवास करर्णायांची संख्या वाढत असल्यामुळे विमानतळांवर आता रेल्वे स्टेशन सारखी गर्दी होऊ लागली आहे. पुणे व मुंबई विमानतळावरील वाढता ताण कमी करण्यासाठी पनवेल-नवी मुंबई येथे होत असलेल्या नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम शासनाने लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.

केंद्र शासनाच्यावतीने मांडण्यात आलेल्या भारतीय विमान विधेयक २०२४ वर लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेत खासदार बारणे यांनी वरील मागणी केली. खासदार बारणे म्हणाले की, सद्यस्थितीत भारतात १५७ विमानतळ आहेत. देशातील वाढत्या लोकसंख्येनुसार विमानतळे वाढण्याची आवश्यकता आहे. एका अहवालानुसार १६ कोटी लोक विमानाने प्रवास करत आहेत. ३ कोटी लोक पहिल्यांदा प्रवास करत आहे. २०३० पर्यंत विमानाने प्रवास करणाऱ्यांची संख्या ३० कोटींपर्यंत जाऊ शकते.



जानेवारी ते जून २०२४ दरम्यान ७ कोटी ९३ लाख लोकांनी देशाअंतर्गत विमान प्रवास केला. गेल्यावर्षी ७ कोटी ६० लाख लोकांनी प्रवास केला होता. काही खासगी कंपन्या विमानाचे उड्डाण रद्द केल्यानंतर त्याचे पैसे परत करत नाहीत. मनमानी केली जाते. हे टाळण्यासाठी नवीन विमानतळ झाली पाहिजेत, असे बारणे म्हणाले. प्रवशांना सोयी-सुविधा दिल्या पाहिजेत. विमानतळावरील कर्मचाऱ्यांना सौम्य बोलणे, यात्री सेवेसंबंधी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे, अशी सूचनाही त्यांनी केली.

पुणे विमानतळ हे संरक्षण विभागाचा सर्वाधिक वावर असलेले विमानतळ आहे. अनेक विमानांचे उड्डाण तेथून होते. त्यामुळे अनेकदा अडचणी येतात. त्यामुळे पुण्यात नवीन विमानतळ निर्माण करण्याबाबत पाऊले उचलावीत. देशात केंद्र आणि राज्य सरकार विमानतळाची निर्मिती करतात. मुंबईतही विमानतळावर मोठे गर्दी होत आहे. त्यासाठी एअरलाईन्सकडून प्रवाशांना दोन - तीन तास अगोदर विमानतळावर बोलविले जाते. या पार्श्वभूमीवर आपल्या मतदारसंघातील पनवेलमधील विमानतळ लवकरात-लवकर सुरु करावे, अशी मागणी बारणे यांनी केली. मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेलमध्ये नवी मुंबई विमानतळ बनत आहे. या विमानतळावरुन २०२५ मध्ये विमानांचे उड्डाण होईल.

# ग्रामपंचायत भेंडखळ

## ता. उरण, जि. रायगड

## जाहिर निविदा

ग्रामपंचायत भेंडखळ ता. उरण, जि. रायगड यांचे कडून खालील विकास कामांकरिता ग्रामपंचायत फंड सन २०२४-२०२५ अंतर्गत कामांकरिता नोंदणीकृत, ठेकेदाराकडून दि. १५/०८/२०२४ ते २१/०८/२०२४ मोहोर बंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी खालील कामांचे कोष्टकात नमुद केल्या प्रमाणे इच्छुक मान्यता प्राप्त ठेकेदार व मालपुरवठादार यांचेकडुन मोहोर बंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | १ % इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा काळावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.सोनाली प्रफुल ठाकूर ते श्री.विकास पांडुरंग ठाकूर यांच्या घरापर्यंत लादी बसविणे. | ६,३६,३७८/— | ६३६३ | १०० | ६ महिने |
| २ | श्री.प्रविण जनार्दन भगत ते श्री.वैभव जयराम भगत यांच्या घरापर्यंत गटार बांधकाम करून लादी बसविणे. | ९८,४५२/— | ९८४ | १०० | ६ महिने |
| ३ | सौ.अमृता हेमंत घरत ते सौ.मिताली मिलींद घरत यांच्या घराच्या परिसरामध्ये लादी व बाजूच्या रस्त्याला पेव्हर ब्लॉक बसविणे. | १,५७,५११/— | १५७५ | १०० | ६ महिने |
| ४ | सौ.नंदा विलास भोईर यांच्या घराच्या परिसरामध्ये लादी बसविणे. | ९९,७४९/— | ९९७ | १०० | ६ महिने |
| ५ | सौ.कुसुम पांडुरंग ठाकूर यांच्या घराच्या परिसरामध्ये लादी बसविणे. | ५३,२१७/— | ५३२ | १०० | ६ महिने |
| ६ | श्री.विजय पांडुरंग ठाकूर ते श्री.भालचंद्र पांडुरंग ठाकूर यांच्या घरापर्यंत गटार बांधकाम करणे. | २,६९,४७२/— | २६९४ | १०० | ६ महिने |
| ७ | श्री.काकु शंकर भगत ते श्री.शक्ति नरेश पाटील ते श्री.राजन कमळाकर पाटील ते मुख्य रस्त्यापर्यंत लादी बसविणे. | १,७९,६७०/— | १७९६ | १०० | ६ महिने |
| ८ | श्री.सिताराम बाळाराम ठाकूर ते श्री.गणपत बाळाराम ठाकूर यांच्या घरापर्यंत गटार बांधकाम करून लादी बसविणे. | ४,९९,८०२/— | ४९९८ | १०० | ६ महिने |
| ९ | श्री.संदिप म्हात्रे ते दशरथ भोईर यांच्या घरापर्यंत लादी बसविणे. | १,६९,७०६/— | १६९७ | १०० | ६ महिने |
| १० | ठाणकेश्वर मंदिर परिसरामध्ये कंपाउंड वॉलचे बांधकाम करणे | ४,३२,९९९/— | ७३२९ | १०० | ६ महिने |
| ११ | श्री.परेश वसंत पाटील ते श्री.अमित गणपत पाटील यांच्या घरापर्यंत लादी बसविणे. | १,२९,८६३/— | १२९८ | १०० | ६ महिने |
| १२ | श्री.लक्ष्मण भोईर ते देविदास भोईर यांच्या घराच्या परिसरामध्ये लादी बसविणे. | २,८२,३५३/— | २८२३ | १०० | ६ महिने |
| १३ | श्री.जगदिश पाटील ते मोहन भोईर यांच्या घरापर्यंत लादी बसविणे. | २,०८,०२३/— | २०८० | १०० | ६ महिने |
| १४ | श्री.रमेश गजानन पाटील यांच्या घरासमोरील परिसरामध्ये लादी बसविणे. | १,५५,५७४/— | १५५५ | १०० | ६ महिने |
| १५ | गणपती मंदिर गल्ली परिसरामध्ये लादी बसविणे. | ६,३६,६५२/— | ६३६६ | १०० | ६ महिने |
| १६ | भेंडखळ येथील स्मशानभुमीचे सुशोभीकरण करणे. | २०,१०,५९८/— | २०१०५ | १०० | ६ महिने |
| १७ | प्रतापपाडा येथील स्मशानभुमीचे सुशोभीकरण करणे. | ७,१५,६३०/— | ७१५६ | १०० | ६ महिने |
| १८ | निता नरेश म्हात्रे ते अशोक गोविंद ठाकूर यांच्या चाळी पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे तसेच संतोष गोपाळ ठाकूर व सुहास हरी ठाकूर यांच्या घराच्या परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९,९४,८६५/— | ९९४८ | १०० | ६ महिने |
| १९ | वासुदेव काशिनाथ भगत ते धर्मराज दामोदर भगत यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | ३,५७,२०२/— | ३५७२ | १०० | ६ महिने |
| २० | धर्मराज दामोदर भगत ते भालचंद्र गणन्नाथ कडू यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | २,६९,७९४/— | २६९७ | १०० | ६ महिने |
| २१ | पांडुरंग कृष्णा घरत ते मधुकर माणिक भोईर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | २,३०,३१३/— | २३०३ | १०० | ६ महिने |
| २२ | सुभाष भगत ते लिलेश्वर दामोदर भगत यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | ६६,१५४/— | ६६१ | १०० | ६ महिने |
| २३ | नासिकेत गिरधर म्हात्रे ते सुभाष जगन्नाथ भगत यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | ७,००,५२१/— | ७००५ | १०० | ६ महिने |
| २४ | मेनरोड ते अंगणवाडी पर्यंत रस्ता व गटार बांधकाम करणे | ४,५४,५०५/— | ४५४५ | १०० | ६ महिने |
| २५ | भोईर आली येथे सहा सिटचे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करणे | ७,४९,९९३/— | ७४९९ | १०० | ६ महिने |
| २६ | पंढरीनाथ भगत ते आर.एस.भगत यांच्या घरापर्यंत गटार बांधकाम करणे | ४,९८,०५५/— | ४९८० | १०० | ६ महिने |
| २७ | शंकर मंदिर परिसरामध्ये लादी बसविणे | २,९५,४९२/— | २९५४ | १०० | ६ महिने |
| २८ | श्री.संजय रामदास ठाकूर यांच्या घराच्या परिसरामध्ये लादी बसविणे | १,९५,५४१/— | १९५५ | १०० | ६ महिने |
| २९ | श्री.वासुदेव नारायण भगत ते मेघश्याम काशिनाथ भगत यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | २,५२,७७०/— | २५२७ | १०० | ६ महिने |
| ३० | ठाणकेश्वर मंदिर परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे | ९,९२,६२७/— | ९९२६ | १०० | ६ महिने |
| ३१ | रतिश रामा पाटील ते मरूआई मठाच्या मागील गल्लीला लादी बसविणे | ३,९६,२१०/— | ३९६२ | १०० | ६ महिने |
| ३२ | श्री.रमेश सुदाम भोईर ते श्री.कृष्णा भाऊ पाटील यांच्या घराजवळील रस्त्याची उंची वाढवून लादी बसविणे | ३,६८,२६४/— | ३६८२ | १०० | ६ महिने |
| ३३ | लक्ष्मी भगवान ठाकूर यांच्या घरासमोरील परिसरामध्ये लादी बसविणे | २,५३,९२६/— | २५३९ | १०० | ६ महिने |
| ३४ | श्री.लिलेश्वर दामोदर भगत ते श्री.निशिकांत चांगदेव भगत यांच्या घराच्या मागे गटार बांधकाम करून लादी बसविणे. | १,४२,०५०/— | १४२० | १०० | ६ महिने |
| ३५ | जयप्रकाश वसंत ठाकूर यांच्या घरासमोरील परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे | २,३६,७६४/— | २३६७ | १०० | ६ महिने |
| ३६ | दामोदर इंद्रसेन ठाकूर यांच्या घरापासून अशोक गोविंद ठाकूर यांच्या चाळीपर्यंत बंधिस्त गटार बांधकाम करणे | ९,७२,८६८/— | ९७२८ | १०० | ६ महिने |
| ३७ | वेल रोड परिसरालगत चेकर टाईल्स बसविणे | ६,९२,५३३/— | ६९२५ | १०० | ६ महिने |
| ३८ | ग्रामपंचायत भेंडखळ हद्दीतील म्हातारआळी येथील मेन रोडला जोडणाऱ्या रस्त्याला साकाव पुलाचे बांधकाम करणे | ८,६७,७८३/— | ८६७७ | १०० | ६ महिने |

**निविदा उघडण्याचा कालावधी : २१/०८/२०२४ रोजी व शक्यतो त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.**

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे:**

१. नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था शासनमान्य नोंदणीकृत असल्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
२. सदरचे कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
३. ग्रामपंचायतीकडे विनंती केल्यास रू. २५/- भरणा करून अंदाजपत्रकाची प्रत देण्यात येईल.
४. निविदा फॉर्म किंमत रू. १००/- ना परतावा समजावी.
५. नियमाप्रमाणे आयकर व व्यवसायकर भरावा लागेल.
६. अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी व इतर ठेकेदाराचा विचार केला जाईल.
७. निविदा मंजुर केल्यास रू. १०० चे स्टॅप पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.
८. ५ टक्के सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातुन कपात केली जाईल.
९. इसारा व सुरक्षा अनामत १८० दिवसाने कामाचा दर्जा पाहून परत येईल.
१०. सदरचे कामाचे ॲडवान्स रक्कम देता येणार नाही. जसे काम होईल त्याप्रमाणे मुल्यांकानुसार बिल अदा केले जाईल.
११. वर्कऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पुर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदाराकडुन ग्रा. पं. काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास प्रथम ठेकेदारांना जबाबदार रहावे लागेल.
१२. वरील सर्व अटी मान्य असणाऱ्यांनी निविदा भरावी. १३. प्रत्येक कामासाठी वेगळी स्वतंत्र निविदा भरण्यात यावी.

सही/—
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचाय भेंडखळ
ता.उरण जि.रायगड

सही/—
सरपंच
ग्रामपंचायत भेंडखळ
ता.उरण जि.रायगड

Owner, Printer & Publish Sunita Bhagwan Kesbhat, Parth Printing Press, Karnala Bhavan, Plot No.456 A/1, Sahakari Bhat Girni Compound Matket yard, Panvel, Dist. Raigad - 410206. Published at Plot No. D-37/34, Sector-12, Kharghar, Navi Mumbai-410210, Tal. Panvel, Dist.- Raigad.
Editor: Sunita Bhagwan Kesbhat RNI NO. MAHMAR/2015/64681